# आरशाची कोडी



पोस्टकार्डावर एक नक्षी काढून ती कापा. एका कोपऱ्यात एक टाचणी टोचा आणि ती नक्षी ट्रेस करा. टाचणी टोचलेल्या टोकातून कार्ड एक-चतुर्थांशात फिरवा आणि परत नक्षी ट्रेस करा. असे करण्याने तुम्हाला सर्व बाजूंनी सारखीच अशी सुरेख नक्षी मिळेल.



कागदावर काहीही आकार काढा आणि त्याच्या बाजूला एक आरसा चिकटवून पहा, तुम्ही काढलेल्या आकाराचे त्यात प्रतिबिंब दिसेल.



एका कागदाची अर्ध्यात घडी करा. दुमडलेल्या बाजूत कोणताही आकार कापा. कागदाची घडी उघडल्यावर दोन्ही बाजूंनी अगदी सारखाच असणारा, प्रमाणबद्ध (सिमेट्रीकल) आकार मिळेल. यातील सिमेट्रीची रेषा कोणती?





MASTER PATTERN

शेजारी मांडणीचा एक नमुना दिला आहे. आता तुमचा आरसा प्रत्येक वेळी या नमुन्याच्या वेगवेगळ्या बाजूने नमुने असे लावा, की जेणेकरून तुम्हाला खाली दिलेले नमुने मिळतील. बहुतेक सर्व तुम्हाला आरशात पाहून मिळवता येतील. पण यातले काही नमुने तुम्हाला चकवण्यासाठी मुद्दाम घातले आहेत. ते नुसते कठीणच आहेत असे नव्हे, तर ते अशक्यच आहेत! यातील कोणते नमुने अशक्य आहेत ते शोधा बरे. ही कोडी सोडवायला तुम्हाला मजा आली असेल, तर तुम्हीही अशी नवी कोडी बनवू शकाल.

